



सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com



**विनम्र अभिवादन!**

लोकशाहीर, कॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

- संपादक

• वर्ष २४ वे • अंक २७६ • शनिवार दि.१ ऑगस्ट २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

# सिद्धीविनायक मंदिरातून दरवर्षी १८ कोटींची चोरी-राज ठाकरे





मुंबई/प्रतिनिधी-दादर मधील प्रसिद्ध सिद्धीविनायक मंदिरात दरवर्षी १८ कोटींची चोरी होत असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी एका मेळाव्यात बोलतांना आज (शनिवार) केला आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या विद्यार्थी विंग असलेल्या नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या वर्धापन दिनानिमित्त शनिवार दि.१ ऑगस्ट रोजी भव्य मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याला राज्यभरातून मनसेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाषणादरम्यान राज ठाकरे यांनी स्वतःकडे आलेले एक पत्र वाचून दाखवले. हे पत्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना संबोधित असून, सिद्धीविनायक मंदिर न्यासातील दानपेटीच्या उत्पन्नातील कथित गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी त्यात करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. राज ठाकरे म्हणाले, भाविक श्रद्धेने मंदिरात जाऊन दानपेटीत पैसे टाकतात. मात्र, तेथेच कर्मचारी चोरी करताना पकडले गेले. कर्मचारी पकडण्यापूर्वी प्रत्येक बुधवारी दानपेटीतील रकमेची मोजदाद ५० लाख रुपयांच्या आसपास होत होती. कारवाईनंतर हीच रक्कम सुमारे दीड कोटी रुपयांपर्यंत पोहोचली. यावरून यापूर्वी मोठ्या प्रमाणात दानाची रक्कम लंपास होत होती. त्यामुळे दरवर्षी सुमारे १८ कोटी रुपयांचे नुकसान होत असल्याचा संशय आहे. या प्रकरणाचे धागेदोरे वरिष्ठ पातळीपर्यंत पोहोचत असल्याचा आरोप करत त्यांनी संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली. संबंधित पत्रावर विश्वस्त राहुल लोंढे, मीना कांबळी, गोपाळ दळवी आणि सुदर्शन सांगळे यांच्या स्वाक्षऱ्या असल्याचा दावाही त्यांनी केला. सिद्धीविनायक मंदिराचा उल्लेख करताना राज ठाकरे म्हणाले, तरुण परीक्षा, नोकरी किंवा आयुष्यातील महत्त्वाच्या टप्प्यांवर देवाकडे प्रार्थनेसाठी येतात. पण ज्या मंदिरात श्रद्धेने दान केले जाते, तिथेच त्या दानाची अफरातफर होत असेल तर ती अत्यंत गंभीर बाब आहे. यावेळी त्यांनी अयोध्येतील राम मंदिराच्या कथित आर्थिक गैरव्यवहाराचाही उल्लेख केला. राम मंदिरात १,४०० कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचे आरोप आहेत. मात्र, यावर सरकारमधील कोणीही बोलत नाही. राम मंदिराच्या नावावर मते मागितली गेली, मग अशा आरोपांवरही सरकारने स्पष्ट भूमिका मांडली पाहिजे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. राज ठाकरे यांच्या या आरोपांमुळे सिद्धीविनायक मंदिरातील आर्थिक व्यवहारांबाबत नव्याने चर्चा सुरू झाली असून, मंदिरातील चोरीच्या गंभीर आरोपामुळे खळबळ उडाली आहे.

## मयत शेतकऱ्यांची झाली कर्जमाफी; केवायसी करायची कशी?,वारसदार संभ्रमात

धर्माबाद/प्रतिनिधी-राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेचा लाभ अनेक मयत शेतकऱ्यांनाही मंजूर झाला आहे. मात्र या शेतकऱ्यांची केवायसी नेमकी कशी करायची? या प्रश्नामुळे वारसदार मोठ्या संभ्रमात सापडले आहेत. योग्य मार्गदर्शनाअभावी वारसदारांना बँका आणि महसूल कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत असून, सर्वत्र उडवाउडवीची उत्तरे मिळत असल्याने तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

सन २०१९ मध्ये थकीत असलेल्या शेतकरी कर्जदारांना या योजनेचा लाभ देण्यात येत आहे. लाभार्थ्यांच्या यादीत अनेक अशा शेतकऱ्यांची नावे आहेत, ज्यांचे दरम्यानच्या काळात निधन झाले आहे. कर्जमाफी मंजूर झाली असली तरी संबंधित लाभार्थी हयात नसल्याने त्यांची केवायसी कोणत्या प्रक्रियेद्वारे पूर्ण करायची, याबाबत कोणतीही स्पष्ट सूचना नसल्याचा दावा वारसदारांनी केला आहे.या संदर्भात वारसदार बँका, महसूल विभाग तसेच संबंधित कार्यालयांकडे वारंवार चकरा मारत आहेत. मात्र कोणत्याही स्तरावर ठोस मार्गदर्शन मिळत नसल्याने कर्जमाफीची प्रक्रिया रखडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. रोशनगाव येथील मारोती राजेश्वर जाधव यांच्यासह अनेक वारसदारांनी प्रशासनाने तातडीने स्पष्ट मार्गदर्शक सूचना जारी करून मयत शेतकऱ्यांच्या केवायसीसाठी स्वतंत्र कार्यपद्धती जाहीर करावी, अशी मागणी केली आहे. त्यामुळे पात्र लाभार्थ्यांच्या वारसांना कर्जमाफीचा लाभ विनाअडथळा मिळू शकेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## महानगरपालिकेच्या वतीने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतर्फे आज (शनिवार) सकाळी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त त्यांच्या विद्युत भवन, नांदेड येथील पूर्णकृती पुतळ्यास महापौर सौ.कविता संतोष मुळे आणि मनपा आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विद्युत भवन समोरील त्यांच्या पुर्णाकृती पुतळ्यासमोर अभिवादन करण्यासाठी अनुयायांनी तसेच सामाजिक, राजकीय व विविध क्षेत्रातल्या मान्यवरांनी सकाळपासूनच गर्दी केली होती. महापौर सौ.कविता मुळे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी माजी राज्यमंत्री डी.पी. सावंत, आ. अमरनाथ राजुरकर, विरेंद्रसिंग गाडीवाले, सदिच्छा सोनी पाटील, किशोर स्वामी, प्रणिताताई चिखलीकर, नगरसेवक साहेबराव गायकवाड, उमेश पवळे, सुमित मुथा, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, निलेश सुंकेवार, उपायुक्त स. अजितपालसिंग संधु, अभिजीत वायकोस, नितीन गाढवे, गंगाधर





ईरलोड, उपअभियंता प्रकाश कांबळे, संतोषभाऊ मुळे, विजय येवणकर, संघरत्न कांबळे, यांच्यासह मनपाचे कर्मचारी व शहरातील नागरीकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# अभद्र भाषेला सर्वांनीच नकार द्यावा!

**देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थी आंदोलनादरम्यान त्यांच्याविरुद्ध व त्यांच्या आईविषयी समाज माध्यमांवर करण्यात आलेल्या आक्षेपार्ह आणि अभद्र भाषेच्या वापराबाबत संबंधित तरुणांना माफ करत त्यांना संयम, सकारात्मकता आणि राष्ट्रनिर्मितीचा संदेश दिला. सार्वजनिक जीवनात कटुता वाढत असताना एखाद्या सर्वोच्च पदावरील व्यक्तीने सूडाऐवजी क्षमेची भूमिका घेणे ही स्वागतार्ह बाब आहे. मतभेद असू शकतात, आंदोलनही होऊ शकते; परंतु शिवीगाळ, वैयक्तिक अपमान आणि अश्लाघ्य भाषा ही कोणत्याही लोकशाही संस्कृतीची ओळख असू शकत नाही. मात्र, या घटनेकडे केवळ एका बाजूने पाहून चालणार नाही. सभ्य भाषा वापरण्याची जबाबदारी फक्त आंदोलनकर्त्यांची नाही, तर सत्ताधारी, विरोधक, राजकीय पक्षांचे नेते, कार्यकर्ते आणि समाज माध्यमांवरील प्रभावी व्यक्ती या सर्वांचीच आहे. अभद्र भाषेचा निषेध निवडक प्रसंगी नव्हे, तर सातत्याने आणि सर्वांसाठी समान निकषांवर व्हायला हवा. अन्यथा सभ्यतेची शिकवणही राजकीय सोयीपुरती असल्याचा संदेश समाजात जातो.नीट पेपरफुटी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दिल्लीतील जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. या आंदोलनाला अनेक सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संघटनांचा पाठिंबा मिळाला. आंदोलनादरम्यान उपोषणास बसलेल्या सोनम वांगचुक यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये तीव्र संताप उसळला. त्यानंतर आंदोलनाचा स्वर अधिक आक्रमक झाला. २० जुलै रोजी विद्यार्थ्यांच्या मोर्चावर झालेल्या पोलिस कारवाईनंतर परिस्थिती आणखी चिघळली. या सर्व घडामोडींमध्ये काही विद्यार्थ्यांनी संतापाच्या भरात मर्यादा ओलांडत अत्यंत आक्षेपार्ह भाषा वापरली. त्या भाषेचे समर्थन कोणत्याही परिस्थितीत होऊ शकत नाही; पण त्या संतापामागील कारणांचा विचार करणेही तितकेच आवश्यक आहे.लोकशाहीमध्ये आंदोलन हा घटनात्मक अधिकार आहे. त्याचप्रमाणे संयम राखणे ही आंदोलनकर्त्यांची नैतिक जबाबदारी आहे. शासनानेही संवादाचा मार्ग स्वीकारला पाहिजे. प्रश्न दुर्लक्षित राहिले, संवादाचा अभाव निर्माण झाला किंवा दडपशाहीची भावना वाढली, तर असंतोष उफाळून येतो. त्यामुळे अशा घटना घडल्यानंतर केवळ भाषेचा निषेध करून थांबण्यापेक्षा त्यामागील कारणांवरही गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे.राजकीय संवादाचा स्तर गेल्या काही वर्षांत सातत्याने खालावत चालल्याची खंत व्यक्त केली जाते. विरोधी पक्षांच्या नेत्यांविषयी वापरले जाणारे अवमानकारक शब्द, सत्ताधाऱ्यांवर होणारे वैयक्तिक हल्ले, महापुरुषांविषयी होणारी वादग्रस्त विधाने किंवा समाज माध्यमांवरील ट्रोल संस्कृती; या सर्वांनी सार्वजनिक चर्चेचा दर्जा घसरवला आहे. कोणत्याही एका पक्षाकडून किंवा विचारसरणीकडून अशी भाषा वापरली गेली, तरी तिचा निषेध समान तीव्रतेने झाला पाहिजे. सभ्यता ही राजकीय पक्षनिष्ठेवर अवलंबून नसते; ती लोकशाही संस्कृतीची मूलभूत अट असते. पंतप्रधानांनी केलेले ''सर्वांनी मिळून देश घडवूया'' हे आवाहन निश्चितच सकारात्मक आहे. मात्र, त्या आवाहनाला अधिक बळ तेव्हाच मिळेल, जेव्हा सार्वजनिक जीवनातील प्रत्येक स्तरावर सभ्य संवादाची परंपरा रुजवण्यासाठी सर्वच राजकीय पक्ष समान प्रामाणिकपणे प्रयत्न करतील. विरोधकांचा अपमान, महापुरुषांविषयी अवमानकारक विधाने किंवा वैयक्तिक टीका यांनाही त्याच निकषांवर विरोध झाला पाहिजे. क्षमा, संयम आणि सुसंस्कृत संवाद यांचा संदेश सर्वांसाठी समान असेल, तरच तो प्रभावी ठरेल. लोकशाहीचा खरा आत्मा मतभिन्नतेत आहे; परंतु त्या मतभिन्नतेला अभद्रतेची जोड मिळाली, तर लोकशाही कमकुवत होते. म्हणूनच विचारांचा संघर्ष हवा, व्यक्तिमत्त्वांचा अपमान नव्हे; कठोर टीका हवी, पण शिवीगाळ नको; राजकीय स्पर्धा हवी, पण सभ्यतेच्या मर्यादा ओलांडून नव्हे. अभद्र भाषेचा निषेध हा निवडक नसून सार्वत्रिक झाला, तरच सुसंस्कृत आणि परिपक्व लोकशाहीच्या दिशेने देशाची वाटचाल अधिक मजबूत होईल.**

# अण्णाभाऊ साठे:लेखनाची प्रेरणा



**डॉ.राजेंद्र बगाटे**

समाजातील उपेक्षित, शोषित आणि वंचित घटकांच्या जीवनाला आपल्या सशक्त लेखणीतून शब्दबद्ध करणारे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे मराठी साहित्यातील एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. त्यांच्या साहित्याने केवळ मराठी साहित्य समृद्ध केले नाही, तर सामाजिक परिवर्तनाची चळवळही अधिक व्यापक केली. त्यांनी आयुष्यभर लेखणीला समाजप्रबोधनाचे प्रभावी साधन मानले आणि साहित्याच्या माध्यमातून अन्याय, विषमता, गरिबी, शोषण आणि मानवी वेदना यांना वाचा फोडली. म्हणूनच त्यांच्या साहित्यिक योगदानाचे स्मरण आणि नव्या पिढीमध्ये लेखनाची प्रेरणा जागविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने १ ऑगस्ट हा त्यांचा जन्मदिन 'लेखन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमामागील मूलभूत हेतू म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याने, प्रत्येक तरुणाने आणि प्रत्येक संवेदनशील नागरिकाने लेखनाच्या माध्यमातून समाजाशी नाते जोडावे, आपले विचार सुसंस्कृतपणे व्यक्त करावेत आणि मराठी साहित्यविश्व अधिक समृद्ध करावे हा आहे. शासन परिपत्रकातही स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक कार्याच्या स्मरणार्थ समाजातील सर्व स्तरांतील प्रतिभावंतांना लेखनाची प्रेरणा मिळावी आणि शैक्षणिक संस्थांमध्ये विविध साहित्यिक उपक्रम आयोजित व्हावेत.

१ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाटेगाव येथे जन्मलेल्या अण्णाभाऊ साठे यांचे बालपण अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत गेले. त्यांना शालेय शिक्षण फारसे घेता आले नाही; परंतु जीवनाच्या कठीण अनुभवांनी त्यांना घडविले. परिस्थितीमुळे त्यांचे कुटुंब मुंबईत स्थलांतरित झाले. गिरणगावातील कष्टकरी जीवन, झोपडपट्ट्यांतील संघर्ष, कामगारांचे हाल, जातीय विषमता आणि सामाजिक अन्याय त्यांनी अत्यंत जवळून अनुभवला. याच अनुभवांनी त्यांच्या साहित्याला वास्तववादी स्वरूप प्राप्त झाले. त्यांनी पुस्तकांमधून जितके शिकले, त्याहून अधिक समाजातून शिकले. त्यामुळे त्यांचे साहित्य कृत्रिम न वाटता जिवंत जीवनाचा आरसा बनले. त्यांनी कधीही राजवाड्यांतील वैभवाची कथा लिहिली नाही; त्यांनी झोपडीतील माणसाचे अश्रू, घाम आणि संघर्ष यांनाच आपल्या साहित्याचा केंद्रबिंदू बनविले.अण्णाभाऊ साठे हे लोकशाहीर म्हणून जितके लोकप्रिय होते तितकेच ते एक समर्थ कादंबरीकार, कथाकार, लोकनाट्यकार आणि सामाजिक विचारवंत होते. त्यांनी विविध साहित्यप्रकारांत विपुल लेखन केले. त्यांच्या साहित्यामध्ये श्रमिक, दलित, स्थलांतरित, शेतमजूर, स्त्रिया, कष्टकरी आणि समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहिलेल्या माणसांचे जीवन अत्यंत प्रभावीपणे चित्रित झाले आहे. त्यांनी साहित्याला केवळ सौंदर्याचा विषय न मानता समाजपरिवर्तनाचे प्रभावी शस्त्र बनविले. त्यांच्या प्रत्येक साहित्यकृतीत संघर्ष आहे, स्वाभिमान आहे, मानवी प्रतिष्ठेचा आग्रह आहे आणि समतेचा संदेश आहे.

त्यांच्या 'फकिरा' या कादंबरीने मराठी साहित्याला नवी दिशा दिली. अन्यायाविरुद्ध झुंज देणाऱ्या सामान्य माणसाच्या संघर्षाचे चित्रण करणारी ही कादंबरी आजही सामाजिक साहित्याचा मानदंड मानली जाते. त्याचप्रमाणे त्यांच्या असंख्य कथा, पोवाडे, लावण्या आणि लोकनाट्यांनी जनतेमध्ये सामाजिक जाणीव निर्माण केली. लोकभाषेतील सहजता, कथनातील ओघवतेपणा आणि वास्तववादी आशय यामुळे त्यांचे साहित्य सर्वसामान्यांच्या मनात घर करून राहिले. त्यांनी लोककलेला परिवर्तनाची दिशा दिली आणि शाहिरीला सामाजिक बांधिलकीचे स्वरूप प्राप्त करून दिले.अण्णाभाऊ साठे यांचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी कधीही स्वतःच्या वैयक्तिक यशासाठी लेखन केले नाही. त्यांच्या लेखणीचा उद्देश समाजातील अन्याय उघड करणे, वंचितांच्या भावना व्यक्त करणे आणि सामान्य माणसाला आत्मविश्वास देणे हा होता. त्यांनी आपल्या साहित्यामधून स्वाभिमान, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचा सातत्याने पुरस्कार केला. त्यांच्या मते लेखक हा समाजाचा जागरूक प्रहरी असतो. तो केवळ घटनांचे वर्णन करत नाही, तर समाजाला विचार करायला भाग पाडतो. त्यामुळे त्यांचे साहित्य आजही तितकेच समकालीन आणि प्रेरणादायी वाटते.आजच्या डिजिटल युगात अभिव्यक्तीची अनेक माध्यमे उपलब्ध झाली आहेत. सामाजिक माध्यमे, संकेतस्थळे, ब्लॉग, ई-पुस्तके आणि विविध डिजिटल व्यासपीठांमुळे प्रत्येकाला आपले विचार मांडण्याची संधी मिळाली आहे. मात्र अभिव्यक्तीची ही संधी जबाबदारीने वापरणे तितकेच महत्त्वाचे आहे. माहितीचा वेग वाढला असला तरी विचारांची खोली कमी होत असल्याची खंत अनेक साहित्यिक व्यक्त करतात. अशा काळात अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य आपल्याला शिकवते की लेखन हे केवळ प्रसिद्धी मिळविण्याचे साधन नसून समाजाप्रती असलेल्या उत्तरदायित्वाची अभिव्यक्ती आहे. लेखकाने सत्याचा शोध घेतला पाहिजे, मानवी मूल्यांचा सन्मान केला पाहिजे आणि समाजातील सकारात्मक परिवर्तनासाठी लेखणीचा उपयोग केला पाहिजे.

याच व्यापक विचारातून महाराष्ट्र शासनाने 'लेखन प्रेरणा दिन' साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. शासन परिपत्रकानुसार विद्यापीठे, महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये कविता, कथा, निबंध लेखन स्पर्धा, वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा, स्थानिक साहित्यिकांच्या मुलाखती व व्याख्याने, ग्रंथदिंडी, अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे वाचन, त्यांच्या व्यक्तिमत्त्व व साहित्यावर व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा आणि साहित्य संमेलनांचे आयोजन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या उपक्रमांचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी, लेखनाची आवड आणि साहित्यिक संवेदनशीलता विकसित करणे हा आहे.लेखन ही केवळ शब्दांची मांडणी नसते; ती विचारांची शिस्त, संवेदनशीलतेची अभिव्यक्ती आणि समाजाशी असलेल्या नात्याची जाणीव असते. जेव्हा एखादा विद्यार्थी कविता लिहितो, कथा रचतो, निबंध मांडतो किंवा एखाद्या सामाजिक विषयावर आपले मत व्यक्त करतो, तेव्हा तो केवळ लेखन करत नसतो; तो आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकासही करत असतो. लेखनामुळे निरीक्षणशक्ती वाढते, चिकित्सक दृष्टी विकसित होते, भाषेवर प्रभुत्व मिळते आणि समाजातील विविध प्रश्नांकडे अधिक व्यापक दृष्टिकोनातून पाहण्याची क्षमता निर्माण होते. म्हणूनच 'लेखन प्रेरणा दिन' हा केवळ साहित्यिक कार्यक्रम नसून विचारक्षम, संवेदनशील आणि जबाबदार नागरिक घडविण्याचा एक प्रभावी सामाजिक उपक्रम आहे.

आजच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल माध्यमे आणि सामाजिक माध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे अभिव्यक्तीची साधने बदलली असली तरी प्रभावी लेखनाचे महत्त्व अजिबात कमी झालेले नाही. उलट माहितीच्या प्रचंड प्रवाहात सत्य, विवेक, संवेदनशीलता आणि सामाजिक जबाबदारी जपणारे लेखन अधिक आवश्यक बनले आहे. अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या काळात लेखणीला परिवर्तनाचे शस्त्र बनविले; आजच्या पिढीने तीच लेखणी ज्ञान, विज्ञान, लोकशाही, संविधानिक मूल्ये आणि मानवी संवेदनशीलता यांची वाहक बनविण्याची गरज आहे. लेखन प्रेरणा दिनाचा खरा अर्थ केवळ लेखनस्पर्धा आयोजित करणे एवढाच नसून विद्यार्थ्यांमध्ये प्रश्न विचारण्याची वृत्ती, चिकित्सक विचारसरणी, कल्पकता आणि सामाजिक बांधिलकी विकसित करणे हा आहे.लेखन ही एक सर्जनशील प्रक्रिया आहे. ती माणसाला स्वतःशी संवाद साधायला शिकवते. वाचनातून विचार जन्माला येतात आणि विचारांमधून लेखन घडते. त्यामुळे लेखन प्रेरणा दिन हा प्रत्यक्षात वाचन संस्कृतीलाही बळ देणारा उपक्रम आहे. ज्या समाजात वाचनाची सवय दृढ असते, त्या समाजात विचारांची देवाणघेवाण समृद्ध होते, मतभिन्नतेचा आदर वाढतो आणि लोकशाही अधिक मजबूत होते. अण्णाभाऊ साठे यांनी स्वतः औपचारिक शिक्षणाची मर्यादा असतानाही सातत्याने वाचन, निरीक्षण आणि अनुभव यांच्या बळावर स्वतःला घडविले. त्यामुळे त्यांचे जीवन प्रत्येक विद्यार्थ्याला एक महत्त्वाचा संदेश देते की परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी जिद्द, जिज्ञासा आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांच्या जोरावर मोठे साहित्य निर्माण करता येते.

आज शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये लेखन कौशल्य विकसित करण्यासाठी विविध उपक्रमांची आवश्यकता आहे. शासनाच्या परिपत्रकातही कविता, कथा, निबंध लेखन स्पर्धा, वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा, स्थानिक साहित्यिकांची व्याख्याने, ग्रंथदिंडी, अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे वाचन, त्यांच्या व्यक्तिमत्त्व व साहित्यावर चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा आणि साहित्य संमेलनांचे आयोजन करण्यावर भर देण्यात आला आहे. हे उपक्रम विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला चालना देतात, भाषिक कौशल्य वाढवितात आणि साहित्याबद्दल आत्मीयता निर्माण करतात.लेखनाची खरी प्रेरणा पुरस्कारातून नव्हे, तर समाजाशी असलेल्या नात्यातून निर्माण होते. जेव्हा लेखक समाजातील वेदना अनुभवतो, सामान्य माणसाच्या आशा-आकांक्षा समजून घेतो आणि त्या प्रामाणिकपणे शब्दबद्ध करतो, तेव्हा त्याचे साहित्य काळाच्या कसोटीवर टिकते. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य याच कारणामुळे आजही अभ्यासले जाते. त्यांनी कधीही कल्पनारम्य वैभवाचे चित्र रंगविले नाही; त्यांनी वास्तवाला शब्द दिले. त्यांच्या लेखनातील पात्रे ही संघर्ष करणारी, स्वाभिमान जपणारी आणि परिवर्तनाची स्वप्ने पाहणारी माणसे आहेत. त्यामुळे त्यांचे साहित्य केवळ एका समाजघटकाचे प्रतिनिधित्व करत नाही, तर संपूर्ण मानवतेच्या संघर्षाची गाथा बनते.

मराठी भाषा ही संत, समाजसुधारक, विचारवंत आणि साहित्यिक यांच्या समृद्ध परंपरेने घडलेली भाषा आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कुसुमाग्रज, पु. ल. देशपांडे, विंदा करंदीकर आणि अण्णाभाऊ साठे यांसारख्या अनेक थोर व्यक्तींनी आपल्या लेखणीतून समाजमन घडविले. या परंपरेचा वारसा पुढे नेण्याची जबाबदारी आजच्या तरुण पिढीवर आहे. लेखन प्रेरणा दिन हा त्या जबाबदारीची जाणीव करून देणारा दिवस आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने, संशोधकाने, शिक्षकाने आणि साहित्यप्रेमीने आपल्या अनुभवांना, निरीक्षणांना आणि विचारांना शब्दरूप देण्याचा संकल्प या दिवशी करणे आवश्यक आहे.लेखन ही समाजपरिवर्तनाची शांत पण अत्यंत प्रभावी प्रक्रिया आहे. तलवारीने जिंकलेली मने काळानुसार बदलतात; परंतु विचारांनी जिंकलेली मने कायमस्वरूपी परिवर्तन घडवितात. अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून हेच सिद्ध करून दाखविले. त्यांच्या लेखणीत संघर्ष होता, पण द्वेष नव्हता; विद्रोह होता, पण विध्वंस नव्हता; अन्यायाविरुद्ध प्रखर आवाज होता, पण मानवतेवरील विश्वास कधीही डळमळला नाही. म्हणूनच त्यांचे साहित्य आजही सामाजिक समता, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठेचे प्रभावी प्रतीक मानले जाते.आजच्या काळात लेखन केवळ साहित्यनिर्मितीपुरते मर्यादित राहिलेले नाही. संशोधन, पत्रकारिता, विज्ञान, तंत्रज्ञान, प्रशासन, न्यायव्यवस्था, शिक्षण, उद्योग, सामाजिक कार्य आणि डिजिटल माध्यमे अशा प्रत्येक क्षेत्रात प्रभावी लेखनाचे महत्त्व वाढत आहे. विचार स्पष्टपणे आणि जबाबदारीने मांडण्याची क्षमता ही यशस्वी व्यक्तिमत्त्वाची ओळख बनली आहे. त्यामुळे लेखन प्रेरणा दिन हा केवळ साहित्यिक कार्यक्रम नसून ज्ञानाधिष्ठित समाज निर्माण करण्याच्या व्यापक ध्येयाशी जोडलेला उपक्रम आहे.

अण्णाभाऊ साठे यांचे जीवन हे आशावाद, संघर्ष आणि सर्जनशीलतेचा प्रेरणादायी प्रवास आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून त्यांनी जागतिक कीर्तीचे साहित्यिक म्हणून स्वतःचे स्थान निर्माण केले. त्यांनी सिद्ध केले की लेखक घडण्यासाठी संपन्न साधने नव्हे, तर जिद्द, संवेदनशीलता आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी आवश्यक असते. त्यांचे संपूर्ण जीवन नवोदित लेखकांसाठी एक प्रेरणादायी विद्यापीठ आहे. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्यांच्या विचारांचा वारसा जपत समाजहिताचे, मानवतावादी मूल्यांचे आणि सत्यनिष्ठेचे लेखन करणे.१ ऑगस्ट रोजी साजरा होणारा 'लेखन प्रेरणा दिन' हा केवळ एका महान साहित्यिकाच्या जयंतीचे औचित्य नसून विचार, वाचन, लेखन आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा उत्सव आहे. प्रत्येक शैक्षणिक संस्थेत, प्रत्येक ग्रंथालयात आणि प्रत्येक घरात या दिवसाच्या निमित्ताने वाचनाची, चिंतनाची आणि लेखनाची नवी चळवळ सुरू झाली, तर तीच अण्णाभाऊ साठे यांना खरी आदरांजली ठरेल. त्यांच्या लेखणीने पेटविलेली सामाजिक जागृतीची मशाल आजच्या पिढीने ज्ञान, समता, न्याय आणि मानवतेच्या प्रकाशाने अधिक तेजस्वी करावी, हाच 'लेखन प्रेरणा दिनाचा' खरा संदेश आहे.

(लेखक, समाजशास्त्र आणि मराठीचे अभ्यासक आहेत)

# ग्रामपंचायत ते विधानसभेची पायरी : जनसामान्यांचे लोकनेते आमदार आनंदराव पाटील बोंढारकर

**श्याम पाटील वानखेडे**
शिवसैनिक,नांदेड.

भारतीय राजकारणात अनेक नेते उदयास येतात आणि काळाच्या ओघात विस्मृतीतही जातात. मात्र काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, त्यांची ओळख केवळ राजकारणापुरती मर्यादित राहत नाही; ती जनतेच्या विश्वासाची, संघर्षाची आणि लोकसेवेची ओळख बनते. नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर हे असेच एक जनसामान्यांच्या मनात घर करणारे लोकनेते आहेत.

कोणतीही मोठी राजकीय पार्श्वभूमी नसताना, केवळ निस्वार्थ लोकसेवा, अथक परिश्रम आणि जनतेच्या आशीर्वादाच्या बळावर ग्रामपंचायतीच्या सदस्यपदापासून ते महाराष्ट्र विधानसभेपर्यंतचा त्यांनी केलेला प्रवास प्रेरणादायी आणि अनुकरणीय आहे.

**मातीशी जोडलेली नाळ नेतृत्वाचा खरा पाया**

खरे नेतृत्व हे मोठ्या कार्यालयांत किंवा सत्तेच्या दालनांत घडत नाही; ते गावाच्या मातीत, जनतेच्या सुख-दुःखात आणि त्यांच्या विश्वासातून घडते. ही बाब आमदार आनंदराव बोंढारकर यांनी आपल्या कार्यातून सिद्ध करून दाखवली आहे.

ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबातून आलेल्या आनंदराव बोंढारकर यांनी सार्वजनिक जीवनाची सुरुवात गावाच्या विकासासाठी स्वतःला झोकून देत केली. गावातील प्रत्येक प्रश्न स्वतःचा समजून त्यावर उपाय शोधण्याची त्यांची वृत्तीच त्यांच्या नेतृत्वाचा पाया ठरली.

सुमारे २५ वर्षे बोंढार गावाचे सरपंच म्हणून त्यांनी विकासाचे नवे आदर्श निर्माण केले. पाणीपुरवठा, रस्ते, मूलभूत सुविधा, ग्रामविकास आणि पारदर्शक प्रशासन या क्षेत्रांत त्यांनी केलेल्या कामांमुळे ग्रामस्थांचा विश्वास दिवसेंदिवस दृढ होत गेला. एका सरपंचाने गावाचा सर्वांगीण विकास कसा साधावा, याचे आदर्श उदाहरण त्यांनी घालून दिले.

**संघर्षातून घडलेला लोकनेता**

सरपंचपदापासून विधानसभेपर्यंतचा प्रवास कधीच सहज नव्हता. प्रत्येक टप्प्यावर राजकीय आव्हाने, विरोधकांचा सामना आणि अनेक संकटे त्यांच्या वाट्याला आली. मात्र त्यांनी संघर्षाला



कधीही पाठ फिरवली नाही.

जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढा देणे, कार्यकर्त्यांची मजबूत फळी तयार करणे आणि प्रत्येक नागरिकाच्या सुख-दुःखात सहभागी होणे, या गुणांमुळे त्यांनी जनतेच्या मनात अढळ स्थान निर्माण केले. ते केवळ निवडून आलेले प्रतिनिधी नसून, सामान्य माणसाचा विश्वास संपादन करणारे लोकनेते ठरले.

**विधानसभेत मतदारसंघाचा बुलंद आवाज**

ग्रामपंचायतीपासून सुरू झालेल्या लोकसेवेची दखल जनतेने घेतली आणि त्यांना नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार म्हणून निवडून दिले.

विधानसभेत पोहोचल्यानंतरही त्यांच्यातील गावचा सरपंच कधीच बदलला नाही. मतदारसंघातील रस्ते, पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण, शेती आणि विकासाशी संबंधित विविध प्रश्न त्यांनी अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडले. शासनाच्या दालनात सामान्य नागरिकांच्या हक्कासाठी सातत्याने आवाज उठवणारा नेता म्हणून त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली.

सत्तेच्या सर्वोच्च व्यासपीठावर पोहोचल्यानंतरही जमिनीशी नाळ कायम ठेवणारे आणि जनतेच्या प्रश्नांसाठी सदैव उपलब्ध असणारे नेतृत्व म्हणजे आमदार आनंदराव बोंढारकर.

**समाजकारणाला दिलेले प्राधान्य**

राजकारणासोबत समाजकारणाची सांगड घालणे ही त्यांची कार्यशैली आहे. वाढदिवस, सार्वजनिक कार्यक्रम किंवा सामाजिक उपक्रम यांना त्यांनी केवळ औपचारिकतेपुरते मर्यादित ठेवले नाही.

वृक्षारोपण, पर्यावरण संवर्धन, आरोग्य शिबिरे, शैक्षणिक उपक्रम, सामाजिक जनजागृती आणि लोकहिताच्या विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून त्यांनी समाजात विधायक संस्कार रुजवण्याचा प्रयत्न केला. लोकांसाठी आणि लोकांमुळे हे तत्त्व त्यांनी आपल्या प्रत्येक कृतीतून जपले आहे.

**अभिष्टचिंतन प्रेरणादायी जीवनप्रवास**

आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांचा ग्रामपंचायत ते विधानसभेपर्यंतचा प्रवास हा केवळ एका राजकीय व्यक्तिमत्त्वाचा प्रवास नसून, तो संघर्ष, जिद्द, प्रामाणिकपणा आणि जनतेवरील निस्सीम प्रेमाचा इतिहास आहे. त्यांचा जीवनप्रवास प्रत्येक कार्यकर्त्याला आणि युवकाला प्रेरणा देणारा आहे. तो शिकवतो कीनिष्ठा, प्रामाणिकपणा आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांच्या जोरावर कोणतीही मोठी पार्श्वभूमी नसतानाही यशाचे शिखर गाठता येते.

जनतेशी कायम जोडलेले राहणारे नेतृत्वच दीर्घकाळ लोकांच्या मनात स्थान मिळवते. गावाच्या विकासातूनच राज्याच्या विकासाचा मार्ग निर्माण होतो.

आज अभिष्टचिंतनाच्या निमित्ताने त्यांच्या आतापर्यंतच्या कार्याचा गौरव करताना, त्यांच्या पुढील सार्वजनिक जीवनासाठी उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि अधिक व्यापक जनसेवेच्या कार्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# अतिरिक्त शुल्क आकारल्यास लॉगिन रद्द

## सेतू सुविधा केंद्र चालकांना तहसीलदारांचा कडक इशारा

देगलूर/प्रतिनिधी-महाराष्ट्र शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेतकरी कर्जमाफी योजनेची प्रभावी अंमलबजावणी, नागरी सेवा अधिक पारदर्शक व नागरिकाभिमुख करण्याच्या उद्देशाने देगलूर चे तहसीलदार यांनी देगलूर येथील तहसील कार्यालय येथे सर्व सेतू सुविधा केंद्र चालकांचे महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत तहसीलदार भरत सूर्यवंशी यांनी विविध शासकीय सेवा बाबत आवश्यक्य सूचना देत नियमाची काटीखोर पालन करण्याचे निर्देश दिले.

बैठकीत शेतकरी कर्जमाफी योजनेअंतर्गत करण्यात येणारी सर्व कारवाई पूर्णपणे निशुल्क करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले. या योजनेच्या नावाखाली कोणत्याही शेतकऱ्याकडून शुल्क अकाउंट नये, अन्यथा संबंधित सेवा केंद्रावर कठोर कारवाई करण्यात येईल असा इशारा देण्यात आला. तसेच नागरी सेवा लॉगिनद्वारे नागरिकांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या विविध शासकीय सेवांसाठी शासनाने निश्चित केलेल्या शुल्का व्यतिरिक्त कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारू नये, अशा सक्त सूचना देण्यात आल्या. त्याची प्रत्येक सेवा केंद्र चालकाने दक्षता घ्यावी,अशी ही सांगण्यात आले. याशिवाय प्रत्यक्ष सुविधा केंद्राने शासनाने मंजूर केलेल्या निश्चित ठिकाणी सेवा सुरू ठेवाव्यात, अर्ज सादर करताना आवश्यक्य मानक कागदपत्राची पूर्ण पूर्तता करावी तसेच घोषणापत्र निर्दोष स्वरूपात सादर करावीत अशी ताकीदही देण्यात आली.नियमाचे उल्लंघन करणाऱ्या किंवा शासनाच्या सूचनाचे पान न करणाऱ्या सेवा केंद्रावर संबंधित लॉगिन रद्द करण्यास आवश्यक्य ती प्रशासकीय कारवाई करण्यात येईल, अशी ही बैठकीत स्पष्ट करण्यात आले. या बैठकीस नायब तहसीलदार गणेश रायेवार तसेच सहाय्यक महसूल अधिकारी सचिन कोनेरी आदी कर्मचारी उपस्थित होते. बैठकीच्या माध्यमातून शासनाच्या योजनाची पारदर्शक अंमलबजावणी नागरिकांना दर्जेदार सेवा आणि शेतकऱ्यांची कोणत्याही प्रकारची आर्थिक पिळवणूक होऊ नये यावर विशेष भर देण्यात आला.

# शिक्षीत समाज,गुणवत्तापूर्ण अभ्यासक्रमासाठी सखोल चर्चा आवश्यक-अॅड.प्रदीप नागापूरकर




नांदेड/प्रतिनिधी-शिक्षण हे केवळ रोजगाराभिमुख नसून समाज घडविणारे, मूल्यसंवर्धन करणारे आणि राष्ट्रनिर्मितीला दिशा देणारे असले पाहिजे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संशोधन, सखोल चर्चा आणि शैक्षणिक अनुभवांच्या आधारे गुणवत्तापूर्ण अभ्यासक्रमाची निर्मिती होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन नांदेड एज्युकेशन सोसायटीचे सचिव अॅड. प्रदीप नागापूरकर यांनी केले.

नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सायन्स कॉलेज, नांदेड येथील मत्स्यविज्ञान व गणित विभागाच्या वतीने तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सहकार्याने 'एनईपी-२०२० अंतर्गत बी.एस्सी. तृतीय वर्षाच्या मत्स्यविज्ञान व गणित विषयांच्या अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणी' या विषयावरील विद्यापीठस्तरीय एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यशाळेचे उद्घाटन अॅड. नागापूरकर यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. एल. पी. शिंदे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या गणित विषयाच्या अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. एम. एस. वावरे उपस्थित होते. मार्गदर्शन करताना अॅड. नागापूरकर यांनी नवीन शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी अभ्यासक्रम विद्यार्थीकेंद्रित, संशोधनाभिमुख आणि काळाच्या गरजेनुसार सक्षम करण्याची आवश्यकता व्यक्त केली. या कार्यशाळेतील विचारमंथनातून मत्स्यविज्ञान व गणित या दोन्ही विषयांच्या गुणवत्तापूर्ण अभ्यासक्रम निर्मितीस निश्चितच दिशा मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. कार्यशाळेत एनईपी-२०२० अंतर्गत बी.एस्सी. तृतीय वर्षाच्या अभ्यासक्रमातील बदल, अध्यापन पद्धती, मूल्यमापन प्रक्रिया, संशोधनाभिमुख शिक्षण आणि अभ्यासक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसंदर्भात तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी सहभागी प्राध्यापकांनी विविध शैक्षणिक मुद्द्यांवर सकारात्मक चर्चा करून आपल्या सूचना मांडल्या. कार्यशाळेचे आयोजन मत्स्यविज्ञान अभ्यास मंडळाचे अध्यक्ष तथा विभागप्रमुख डॉ. किरण एस. शिल्लेवार आणि गणित विभागप्रमुख डॉ. पी. आर. कुलकर्णी यांच्या पुढाकाराने करण्यात आले. विद्यापीठाशी संलग्न विविध महाविद्यालयांतील प्राध्यापकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# किनवटमध्ये पोलिसांनी तलवारबाज गुंडाची बेड्या ठोकून काढली धिंड



### मेटकर जामिनावर बाहेर

दरम्यान, विष्णू मेटकर विरुद्ध किनवट पोलीस ठाण्यात नोंद केलेले गुन्हे हे बेलेबल असल्यामुळे विष्णू मेटकरची रात्रीच ठाण्यातूनच जामिनावर सुटका झाली असल्याचे सूत्रांनी सांगितले.

किनवट/प्रतिनिधी-किनवटच्या गंगानगरातील बावीस वर्षीय हद्दपार सराईत गुन्हेगार विष्णू मेटकर याने हद्दपारीचा आदेश मोडीत काढून गंगानगर भागात तलवार घेऊन जनमानसात दहशत माजवत होता. घरफोड्या आणि चोऱ्यांचाही त्याच्यावर आरोप करण्यात आलाय. किनवट पोलिसांना माहिती मिळताच पोलीस पथकाने वेळीच धाव घेऊन त्याला ताब्यात घेतले. ३१ जुलै रोजी दुपारी एक वाजताचे दरम्यान बेड्या ठोकून धिंड काढून गुन्हेगारी विश्वातील गुंडांना पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी इशारा दिलाय. उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रशेखर कदम आणि पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या समन्वयातून अवैध धंदे आणि गुंड प्रवृत्तीच्या मुसक्या आवळण्यावर भर दिलाय.

विष्णु मेटकरच्या गंभीर गुन्ह्यांमुळे दोन जिल्ह्यांतून हद्दपार करण्यात आलाय. हद्दपारच्या काळात कायद्याचे उल्लंघन करून किनवट शहरात चोऱ्या व घरफोड्या करण्याच्या उद्देशाने पोलीसांची नजर चुकवून वावरत होता, हा अतिशय गंभीर प्रकार म्हणावा लागेल.गंगानगर भागात तलवार घेऊन नागरिकांमध्ये दहशत निर्माण करण्याचा त्याचा उद्देश होता. किनवट पोलीसांना माहिती मिळाल्यानंतर पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने त्याला मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले. गुन्हेगारांमध्ये कायद्याचा धाक असावा म्हणून पो.नि.कराड यांनी मेटकरला बेड्या ठोकून त्याची शहरातील मुख्य रस्त्यावरुन धिंड काढली. पो.नि.कराड यांच्या या भूमिकेचे तमाम नागरिकांनी स्वागत केले. गुन्हेगारांमध्ये कायम वचक राहिल अशीच ही उल्लेखनीय कारवाई केलीय. किनवटच्या इतिहासातील कदाचित ही दुसरी कारवाई असावी.पोहेकॉ चंद्रशेखर केरबा मुंडे यांच्या फिर्यादीवरून किनवट पोलीस ठाण्यात मेटकरविरुद्ध गु.र.नं. १८५/२०२६ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ आणि भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ अन्वये गुन्ह्याची नोंद करण्यात आली. पोहेकॉ दिलीप सिरमनवार हे पुढील तपास करीत असल्याचे सूत्रांनी सांगितले.

# अण्णाभाऊ साठे यांचे विचार समाजाला नवी दिशा देणारे-संभाजी पाटील भिलवंडे

नायगाव/प्रतिनिधी-लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे केवळ साहित्यिक नव्हते, तर ते अन्याय, विषमता आणि शोषणाविरुद्ध लढणाऱ्या कष्टकरी, उपेक्षित व वंचित समाजाचा बुलंद आवाज होते. त्यांनी समता, स्वाभिमान, बंधुता आणि सामाजिक न्यायाचा दिलेला संदेश आजही समाजाला नवी दिशा देणारा आहे. त्यांच्या विचारांचे स्मरण करण्यापेक्षा ते प्रत्यक्ष जीवनात आचरणात आणणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे प्रतिपादन नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष संभाजी पाटील भिलवंडे यांनी केले.

ते नरसी येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त आयोजित भव्य कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलत होते. नरसी शहरात हा जयंती सोहळा मोठ्या उत्साहात, सामाजिक सलोख्याच्या वातावरणात तसेच असंख्य समाजबांधव, मान्यवर, महिला, युवक आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत अत्यंत दिमाखात संपन्न झाला.कार्यक्रमाच्या प्रारंभी राजेश पाटील भिलवंडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थितांनी घोषणांच्या गजरात अण्णाभाऊंच्या विचारांना अभिवादन करत सामाजिक ऐक्याचा संदेश दिला.यावेळी माजी जि. प.सदस्य माणिक लोहगावे, माजी उपसरपंच मोहनराव पा.भिलवंडे, विद्यमान सरपंच गजानन पा. भिलवंडे, माजी सरपंच एन. डी. नरसीकर, ग्रा.पं. अधिकारी यरसनवार, मधुकर पा.ताटे, परगेवार, ग्रा.पं. सदस्य पपन गायकवाड, संभाजी मिसे, राजू सूर्यवंशी, खाकीबा सूर्यवंशी, शाम गायकवाड, लालबा सूर्यवंशी, अनिल बोधने, विजय सूर्यवंशी, संतोष कुडके, जळबा सूर्यवंशी, मनीषाताई नरसीकर, रेड्डी मॅडम, गजानन पाटे, पत्रकार गोविंद नरसीकर, सुभाष सूर्यवंशी, स. आजीम यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात संभाजी पाटील भिलवंडे म्हणाले की, गरिबी ही यशाच्या आड येत नाही. जिद्द, परिश्रम आणि आत्मविश्वासाच्या बळावर इतिहास घडविता येतो, हे अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या जीवनातून सिद्ध केले. त्यांचे साहित्य हे केवळ वाचनासाठी नसून सामाजिक परिवर्तनाची चळवळ आहे.

# पीक विम्याचा प्रचार शेतकऱ्यांच्या दारी; प्रत्यक्ष मात्र कंपन्यांचे उंबरठे झिजवण्याची वेळ

धर्माबाद/प्रतिनिधी-शासनाकडून पीक विमा योजनेसाठी कृषी विभागाकडून जनजागृती व प्रचार आणि प्रसार मोठ्या थाटामाटात थेट शेतकऱ्यांच्या घरापर्यंत केला जात असला तरी, मात्र अवकाळी पाऊस, अतिवृष्टी किंवा इतर नैसर्गिक नैसर्गिक आपत्तीमुळे प्रत्यक्ष पिकांचे नुकसान झाल्यावर मात्र भरपाई मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना विमा कंपन्या आणि शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत असल्याचा धक्कादायक विरोधाभास समोर आला आहे.

प्रचार दारी आणि हेलपाटे भारी अशीच काहीशी अवस्था सध्या सामान्य शेतकऱ्यांची झाली आहे. जाचक अटी आणि तांत्रिक क्लिष्टतेचा फटकापिकांचे नुकसान झाल्यास ७२ तासांच्या आत ऑनलाइन तक्रार नोंदवण्याची अट विमा कंपन्यांनी घातली आहे. ग्रामीण भागात अँड्रॉइड फोन नसणे, नेटवर्क नसणे, सर्व्हर डाऊन असणे किंवा माहितीचा अभाव यामुळे अनेकदा ही मुदत टळते. परिणामी, हजारो रुपयांचे नुकसान होऊनही शेतकरी भरपाई पासून वंचित राहत आहेत. त्यातच स्थानिक पातळीवरील वैयक्तिक नुकसानीचे निकष बदलून केवळ 'पीक कापणी प्रयोगा'वर भर दिला जात असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष आहे. तुटपुंज्या भरपाईमुळे शेतकऱ्यांना हजारो रुपयांच्या नुकसानीच्या बदल्यात केवळ १०० ते २०० रुपयांची तुटपुंजी भरपाई मिळाल्याच्या घटना घडल्या आहेत. तक्रार करण्यासाठी जाण्या-येण्याचा खर्चच विम्याच्या रकमेपेक्षा जास्त होत असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. याच जाचक अटी आणि फसवणुकीमुळे चालू हंगामात शेतकऱ्यांनी पीक विम्याकडे मोठ्या प्रमाणावर पाठ फिरवली असून, विमा नोंदणीत मोठी घट झाल्याचे चित्र आहे. त्यामुळे प्रशासनाला नोंदणीसाठी मुदतवाढ देण्याची वेळ आली आहे. शेतकऱ्यांची मागणीविमा कंपन्यांनी केवळ नफा कमवण्याचा उद्देश न ठेवता शेतकऱ्यांना प्रत्यक्ष जमिनीवर झालेल्या नुकसानीची योग्य भरपाई द्यावी. तसेच, ७२ तासांची जाचक अट शिथिल करून तांत्रिक प्रक्रियेत सुटसुटीतपणा आणावा, अशी मागणी आता शेतकरी वर्गातून जोर धरू लागली आहे.

# आ.भीमराव केराम यांच्याकडून अतिवृष्टीग्रस्तांना तात्काळ मदतीचा हात



मांडवी/प्रतिनिधी-किनवट तालुक्यातील तेलंगणा सीमेवरील पिंपळगाव फाटा परिसरात २९ व ३० जुलै रोजी झालेल्या मुसळधार अतिवृष्टीमुळे अनेक कुटुंबांचे मोठे आर्थिक व भौतिक नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीची तात्काळ दखल घेत स्थानिक आ.भीमराव केराम यांनी बाधित कुटुंबांना मदतीचा खंबीर हात दिला आहे.

भाजपा नेते रमेश बद्दीवार यांच्या माध्यमातून आ. केराम यांनी पूरबाधित कमल गुलाब गुरनुले व माधव राम कांबळे यांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन त्यांची आस्थेने विचारपूस केली. संकटसमयी केवळ सांत्वन न करता, आ. केराम यांनी पीडित कुटुंबांना तात्काळ रोख आर्थिक मदत, कपडे आणि रेशन किटचे वाटप केले. संकटाच्या काळात नागरिकांच्या पाठीशी आमचे सरकार आणि आम्ही खंबीरपणे उभे आहोत, असा विश्वास त्यांनी या वेळी दिला. या मदत वाटप प्रसंगी पिंपळगाव फाटा परिसरातील प्रमुख नागरिक व लोकप्रतिनिधींची उपस्थिती होती. यामध्ये सरपंच पुरुषोत्तम पेंदोर, विकास कुडमुथे, गजानन मंदाडे, मनोज भंपलवार, शंकर मेश्राम, दासू गावात्रे, ओमकार कलेठीवार, प्रमोद गुरनुले, गजानन शेंडे आणि दत्ता गुरनुले यांच्यासह अनेक कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते. लोकप्रतिनिधींनी दाखवलेल्या या तत्परतेमुळे आपत्तीग्रस्तांना मोठा दिलासा मिळाला असून परिसरातून समाधान व्यक्त केले जात आहे.

# नौकरीचे आमिष दाखवून तरुणाला पाच लाखाला फसविले

नांदेड/प्रतिनिधी-नौकरी लावून देतो म्हणून एका युवकास पाच लाख रुपयाला फसविल्या प्रकरणी आरोपी विरुद्ध तामसा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कांडली ता.हिमायतनगर येथील श्याम युवराज बोरकर (वय ३१) या युवकास प्रकाश कचरुदास गायकवाड रा.नांदेड याने नौकरीचे आमिष दाखविले. नौकरी लावतो म्हणून त्याने ७ मे २०२६ रोजी बोरकर याच्याकडून फोन पे वरुन ५ लाख १० हजार रुपये घेवून त्याची फसवणूक केली. याप्रकरणी प्रकाश गायकवाड याच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२६८/२०२६

अर्जदार -

| | | | |
|---|---|---|---|
| १ | तानाजी मारोती गंदलपवाड<br>नवरंगपुरा, ता.कंधार जि.नांदेड | वय-५६ वर्षे | धंदा-मजुरी |
| २ | नागलवाड विमलबाई शंकर<br>भीमगड, ता.कंधार जि.नांदेड | वय-५५ वर्षे | धंदा-घरकाम |
| ३ | कलावतीबाई भ्र.गंगाराम प्रेमालवाड<br>नवरंगपुरा, ता.कंधार जि.नांदेड | वय-५१ वर्षे | धंदा-घरकाम |
| ४ | शिवाजी मारोती गंदलपवाड<br>नवरंगपुरा, ता.कंधार जि.नांदेड | वय-४७ वर्षे | धंदा-मजुरी |

विरुद्ध - गैरअर्जदार

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-ओ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी असे की, सदरील प्रकरणातील अर्जदार क्र.१ ते ४ आपापसात भाऊ बहीन आहेत. मयत नामे मारोती हौनाजी गंदलपवाड हे होते. दिनांक ०६/०७/२०२१ रोजी मयत झाले आहे. अर्जदारांचे म्हणणे आहे की मारोती होनाजी गंदलपवाड यांचे अर्जदारा शिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत मारोती होनाजी गंदलपवाड यांचे वारस असलेबाबत शासकीय व निमशासकीय कामासाठी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत मारोती होनाजी गंदलपवाड यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख - ०१/०९/२०२६

आज रोजी दि.२७/०७/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार

स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
सह दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार

### तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक - २९/०७/२०२६

(जन्म मृत्यू शाखा)

## जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार राजू मोतीराम देशमुख रा.कंधार ता.कंधार जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा मुलगा गंगाधर राजू देशमुख रा.कंधार ता.कंधार जि. नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेंल्याचे नाव गंगाधर राजू देशमुख रा.कंधार ता.कंधार या ठिकाणी दिनांक १५/०६/२००९ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक २३/०७/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

### तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक - ३१/०७/२०२६

(जन्म मृत्यू शाखा)

## जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार सय्यद रसूल मियांसाहेब रा.उमरज ता.कंधार जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा सय्यद रसूल मियांसाहेब रा.उमरज ता. कंधार जि. नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेंल्याचे नाव सय्यद रसूल मियांसाहेब रा.उमरज ता.कंधार या ठिकाणी दिनांक १०/०१/१९७२ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक २४/०७/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

### तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक - ३१/०७/२०२६

(जन्म मृत्यू शाखा)

## जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार सय्यद खाजा मोईनोद्दिन रसूल रा.उमरज ता.कंधार जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा सय्यद खाजा मोईनोद्दिन रसूल रा.उमरज ता.कंधार जि. नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेंल्याचे नाव सय्यद खाजा मोईनोद्दिन रसूल रा.उमरज ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०८/१२/२००७ या दिवशी जंन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक २४/०७/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

### तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक - ३१/०७/२०२६

(जन्म मृत्यू शाखा)

## जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार राजू मोतीराम देशमुख रा.कंधार ता.कंधार जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा मुलगा सौरभ राजू देशमुख रा.कंधार ता.कंधार जि. नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेंल्याचे नाव सौरभ राजू देशमुख रा.कंधार ता.कंधार या ठिकाणी दिनांक १७/०८/२०१० या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक २३/०७/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

# रखडलेली कामे पूर्ण करा,अन्यथा जनआंदोलन छेडू

## विशाखा महिला मंडळाने दिला न.पा.प्रशासनाला इशारा

किनवट/प्रतिनिधी-स्थानिक सिद्धार्थनगरातील जेतवन बौद्ध विहाराच्या सभामंडपाचे काम पूर्ण करण्यापासून ते संविधान स्मारकाच्या सुशोभीकरणापर्यंतच्या विविध मागण्यांवर नगरपरिषद प्रशासनाने तातडीने निर्णय घेऊन कामे करण्यासाठी विशाखा महिला मंडळाच्या वतीने नगराध्यक्षा सौ. सुजाताताई येंड्रलवार व नगर परिषदेचे मुख्याधिकारी मुगाजी काकडे यांना निवेदन दिले आहे. याकामी दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न केल्यास जनांदोलनच हा एकमेव पर्याय असल्याचा इशारा दिला आहे.



सिद्धार्थनगर येथील जेतवन बौद्ध विहारावर सुरू असलेले सभामंडपाचे काम गेल्या काही काळापासून अर्धवट स्थितीत असून अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याचा ठपका ठेवला असून विनाविलंब दर्जेदार काम करण्यात यावे. विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणीसाठी मंजुरी मिळालेली असतानाही अद्याप कामाला सुरुवात झालेली नाही. त्यामुळे मंजूर असलेला हा पुतळा त्वरित उभारण्यात यावा, तसेच पुतळा परिसरातील केलेले अतिक्रमाने काढून परिसराचे सुशोभीकरण करण्यात यावे. छत्रपती शिवाजी महाराज चौकातील संविधान स्मारक हे सर्व नागरिकांसाठी अस्मितेचे असून स्मारकाची तात्काळ दुरुस्ती करून परिसर सुशोभित करावा, अशी मागणी निवेदनात केलीय. तसेच शांतिभूमी (स्मशानभूमी) येथे मंजूर करण्यात आलेल्या लॉन्सचे काम संथगतीने सुरू असल्याने ते काम तातडीने मार्गी लावण्याची मागणी करण्यात आलीय. सिद्धार्थनगरच्या विशाखा महिला मंडळाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मुख्याधिकाऱ्यांना हे निवेदन सोपवले. प्रशासनाने या सर्व मागण्यांकडे गांभीर्याने पाहून लवकरात लवकर ठोस पावले न उचलल्यास संपूर्ण आंबेडकरी समाजाला सोबत घेऊन नगर परिषदेसमोर तीव्र निदर्शने आणि जनांदोलन छेडण्याचा इशारा या महिला मंडळाने सादर केलेल्या निवेदनात दिला आहे.

# फोटो, व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देवून खंडणी उकळणाऱ्या टोळीला अटक

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील बेलानगर भागात एका इसमाचे फोटो व व्हिडीओ जबरदस्तीने काढून समाजमाध्यमावर व्हायरल करण्याची धमकी देत खंडणी उकळणाऱ्या चार महिलांसह एका पुरुषाला भाग्यनगर पोलीसांनी अटक केली आहे.



शुक्रवार दि.३१ जुलै रोजी एका महिलेने तक्रार करणाऱ्या इसमाच्या मोबाईलवर संपर्क साधून ड्रायव्हरची आवश्यकता असल्याचे सांगितले. सदरील इसमास बेलानगर परिसरात बोलाविण्यात आले. तेथे उपस्थित असलेल्या चार महिलांसह एका पुरुषाने सदरील इसमास बोलण्यात गुंतवुन एका घरात घेवून गेले. महिलांनी इसमाचे हात पकडून त्याचे शर्ट काढले. बनियनवरील फोटो काढले. तसेच व्हिडीओ चित्रीत करुन चार महिलांनी व एका पुरुषाने सदरील इसमास फोटो व व्हिडीओ सोशल मिडियावर व्हायरल करण्याची धमकी दिली. तसेच बलात्काराच्या गुन्ह्यात अडकविण्याची धमकी देवून १ लाख रुपये खंडणीची मागणी केली. इसमाच्या हातातील १ लाख २० हजार रुपये किंमतीची ८ ग्रॅमची सोन्याची अंगठी जबरदस्तीने काढून घेतली. इसमाला शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर चार महिला व पुरुष घटनास्थळावरुन निघुन गेले. सदरील इसमाने भाग्यनगर पोलीस स्टेशन गाठून रितसर तक्रार दाखल केली. याप्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस अधीक्षक डॉ.निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरिक्षक संतोष तांबे, फौजदार विनोद देशमुख व पोलीस कर्मचाऱ्यांनी तांत्रिक माहिती व स्थानिक माहितीच्या आधारे आरोपीचा शोध घेवून काही तासातच शिला सुनील भदरगे (वय २९) रा.बेलानगर, इंदुबाई विठ्ठल बाऱ्हाटे (वय ५५) रा.संतोषनगर, नांदेड, सुनीता रामकांत सोनकांबळे (वय ५५) रा.सप्तगिरी कॉलनी, नांदेड, रेखा रामचंद्र इंगोले (वय ४५) रा.देगावचाळ,नांदेड, अमन मारोती कांबळे (वय २२) रा.पालीनगर,नांदेड यांना अटक केली. पोलीसांनी आरोपींकडून दोन स्कुटी वाहने, चार मोबाईल, एक तीन चाकी ऑटो, आठ ग्रॅम सोन्याची अंगठी असा एकूण साडेपाच लाख रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.

# दोन मतांनी विजय; पण '१८ मतांचा हिशेब' सत्ताधाऱ्यांच्या जिव्हारी?

माहूर/प्रतिनिधी- नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदाची निवडणूक संपली, निकाल लागला, विजेताही ठरला; पण माहूर तालुक्यातील राजकीय धुरळा अद्याप खाली बसलेला नाही. उलट, आता सुरू झाली आहे '१८ मतांचा हिशेब' शोधण्याची मोहीम. निवडणुकीदरम्यान अपेक्षित साथ देण्याचे आश्वासन देऊनही प्रत्यक्ष मतदानात वेगळी भूमिका घेतल्याचा संशय असलेल्या काही मतदारांना लक्ष्य केले जात असल्याची चर्चा तालुक्याच्या राजकीय वर्तुळात जोर धरू लागली आहे.

२६ जुलै रोजी झालेल्या या अटीतटीच्या लढतीत प्रा. राजेंद्र केशवे यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख ज्योतिबा खराटे यांचा अवघ्या दोन मतांनी पराभव केला. मात्र विजय मिळाल्यानंतरही सत्ताधारी गटाचा आनंद फिका पडल्याची चर्चा आहे. कारण, सर्व राजकीय ताकद पणाला लावूनही विरोधी उमेदवाराला तब्बल १८ मते कशी मिळाली, हा प्रश्न अजूनही अनेकांच्या गळ्यात अडकला आहे. प्राथमिक कृषी पतपुरवठा व विकास सेवा सहकारी संस्था आणि धान्य अधिकोष मतदारसंघातील सर्व ३८ मतदारांनी मतदान केले. प्रा. केशवे यांच्या विजयासाठी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, आ.भीमराव केराम यांच्यासह सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी पूर्ण ताकद लावली होती. दुसरीकडे, कोणतेही मोठे राजकीय पाठबळ नसताना ज्योतिबा खराटे यांनी मर्यादित साधनसामग्रीत महाविकास आघाडीतील चार दोन छातीला माती लाऊन काम करणाऱ्या साथीदाराना सोबत घेऊन निवडणूक लढवत सत्ताधाऱ्यांना शेवटच्या क्षणापर्यंत धडकी भरवली. निवडणुकीत धनशक्तीचा मोठ्या प्रमाणावर वापर झाल्याची चर्चा सुरुवातीपासूनच होती. विरोधी गटाला न्यायालयीन प्रक्रियेत अडकवून ठेवण्याचा प्रयत्न झाल्याचाही आरोप करण्यात आला. मतदानाला अवघे दहा दिवस बाकी असताना सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे विरोधी गटाचे आठ मतदार पुन्हा पात्र ठरले. त्यापैकी एकाने ऐनवेळी उमेदवारी अर्ज भरून निवडणुकीचे चित्रच बदलून टाकले. याआधीच सहलीच्या निमित्ताने ३८ पैकी १४ मतदार तालुक्याबाहेर गेल्याने विरोधी गटासमोर सुरुवातीपासूनच कठीण आव्हान उभे राहिले होते. प्रत्यक्षात उपलब्ध असलेल्या मतांवरच संपूर्ण रणनीती उभी करावी लागली. तरीही ज्योतिबा खराटे यांनी १८ मते मिळवत सत्ताधाऱ्यांच्या अभेद्य किल्ल्यात मोठी खिंडार पाडल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे. आता याच १८ मतांचा हिशेब सत्ताधाऱ्यांना अस्वस्थ करत असल्याची चर्चा आहे. निवडणुकीनंतर काही मतदारांना जाब विचारला जात असून, शब्द दिला आणि मतदान दुसरीकडे झाले या कारणावरून त्यांच्यावर दबाव टाकला जात असल्याचे बोलले जात आहे. या चर्चांना अधिकृत दुजोरा मिळालेला नसला तरी राजकीय वर्तुळात त्याची जोरदार चर्चा सुरू आहे. जिल्हा बँकेची हि निवडणूक केवळ दोन मतांच्या विजयापुरती मर्यादित राहिलेली नाही. धनशक्ती, न्यायालयीन घडामोडी, शेवटच्या क्षणापर्यंत चाललेले राजकीय डावपेच आणि आता सुरू झालेल्या कथित 'मतांच्या हिशेबा'च्या चर्चांमुळे माहूरच्या राजकारणात नव्या संघर्षाची नांदी ठरत असल्याचे चित्र आहे. येत्या काही दिवसांत स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत या चर्चा केवळ राजकीय कुजबुज ठरतात की त्यातून नवे राजकीय वादळ निर्माण होते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.




लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त काँग्रेसच्यावतीने त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी खा.रविंद्र चव्हाण, सुरेशदादा गायकवाड, डॉ.श्रावण रॅपनवाड, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, अब्दुल गफार, ॲड.सुरेंद्र घोडजकर, आनंद कल्याणकर, प्रा.ललिता कुंभार, सत्यपाल सावंत, मुन्ना अब्बास यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी,कार्यकर्ते उपस्थित होते.




# आ.चिखलीकर यांनी उपजिल्हा रुग्णालयाची केली पाहणी

कंधार/प्रतिनिधी-कंधार येथील नव्याने उभारण्यात आलेल्या उपजिल्हा रुग्णालयाच्या इमारतीची आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित विभागाच्या प्रमुख अधिकाऱ्यांसमवेत आढावा बैठक घेतली. रुग्णालयाच्या नव्या इमारतीचे हस्तांतरण तातडीने पूर्ण करून ती लवकरात लवकर नागरिकांच्या सेवेत सुरू करण्याच्या दृष्टीने आवश्यक बाबींचा सविस्तर आढावा यावेळी घेण्यात आला.



यावेळी बोलताना आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी नवीन व अद्ययावत उपजिल्हा रुग्णालयाची इमारत लवकरच हस्तांतरित होऊन कंधार शहरासह परिसरातील नागरिकांना दर्जेदार व आधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध होतील, असा विश्वास व्यक्त केला. या पाहणी व आढावा बैठकीस जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता गलधरजी, कंधारचे उपविभागीय अधिकारी विलास नरवटे, तहसीलदार रामेश्वर गोरे, कंधार नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष मन्ना चौधरी, माजी उपनगराध्यक्ष जफरोद्दिन बाहोद्दिन, खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष किशनराव डफडे, कंधार सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता नितीन आयतलवाड, लोहा सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता सुमित पाटील, नगरसेवक शेख आसिफ, नगरसेवक समीर चाऊस, नगरसेवक सुहास कांबळे, बाळासाहेब पवार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक शंकर पाटील दिग्रसकर, मधुकर पाटील डांगे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गोकुंदा येथील पत्याच्या क्लबवर पोलीसांची धाड;सोळा जणांना अटक

नांदेड/प्रतिनिधी-किनवट शहराजवळ असलेल्या गोकुंदा येथील हमाल कॉलनीत सुरु असलेल्या पत्याच्या क्लबवर शुक्रवारी पोलीस उपअधीक्षक कार्यालयातील पोलीस पथकाने धाड टाकुन सोळा जणांना अटक केली आहे.

हमाल कॉलनी भागात पत्याचा क्लब म्हणजे जुगाराचा अड्डा सुरु असल्याची माहिती पोलीस उपअधीक्षक चंद्रशेखर यांना मिळाली. त्यांच्या आदेशावरुन कार्यालयातील सहाय्यक फौजदार माधव मेथेवाड व पोलीस कर्मचाऱ्यांनी शुक्रवारी जुगार अड्डयावर धाड टाकली. पैसे लावून जुगार खेळत असतांना पोलीसांनी शेख समीर शेख फरीद (वय १९) रा.समतानगर, शेख साहिल शेख चाँद (वय २७) रा.दत्तनगर, गोकुंदा, शेख रफीक शेख अहमद (वय ३८) रा.समतानगर, सय्यद शाहीद स.नुर (वय २१) रा.मोमीनपुरा, सय्यद मोसीन स.खाजा (वय २२) रा.सुभाषनगर, सोहेल शेख अब्दुल गफार (वय २६) रा.समतानगर, सय्यद माजीद स.अख्तर (वय २३) रा.बिलालनगर, गोकुंदा, सलमान रमजान सय्यद (वय २५) रा.समतानगर, सय्यद कलीम स.हमदुला (वय २८) रा.समतानगर, शेख रफीक शेख फरीद (वय ३५) रा.हबीब कॉलनी, गोकुंदा, अफताब खान वसीम खान (वय २४) रा.मोमीनपुरा, हर्षद जानी खान (वय २७) रा.समतानगर, अनवरअली मकसुदअली शेख (वय २९) रा.सुभाषनगर, शेख अशरफ शेख मुस्तफा (वय २१) रा.सुभाषनगर, किनवट यांना अटक करण्यात आली. आरोपींजवळ फक्त ९ हजार ८०० रुपये पोलीसांना सापडले. याप्रकरणी सोळा जणांविरुध्द किनवट पोलीस ठाण्यात मुंबई जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आाल आहे.

# नांदेडात उद्यापासून रंगणार स्वप्नरंग नाट्य महोत्सव

नांदेड/प्रतिनिधी-संस्कृती मंत्रालय, भारत सरकार आणि स्वप्नरंग सांस्कृतिक संस्था, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित त्रिदिवसीय स्वप्नरंग नाट्य महोत्सवाला रविवार, दि.२ ऑगस्टपासून डॉ. शंकरराव चव्हाण सभागृह, नांदेड येथे प्रारंभ होत आहे. महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी सायंकाळी ७ वाजता मुंबईच्या माणूस फाऊंडेशन प्रस्तुत अलेक्झांडर व्हाया डायोजेनिस या गाजलेल्या मराठी नाटकाचा प्रयोग सादर होणार आहे.

या नाटकाचे लेखन व दिग्दर्शन डॉ. सोमनाथ सोनवलकर यांनी केले असून, आशयघन विषय, प्रभावी मांडणी आणि कलाकारांच्या दमदार अभिनयामुळे या नाटकाला राज्यभरातील नाट्यरसिकांची उत्स्फूर्त दाद मिळाली आहे. नांदेडमधील प्रेक्षकांनाही हा दर्जेदार नाट्यप्रयोग पाहण्याची संधी या महोत्सवाच्या माध्यमातून उपलब्ध होत आहे.दि.२ ते ४ ऑगस्ट दरम्यान आयोजित या महोत्सवात मुंबई, पुणे, परभणी, लातूर आणि नांदेड येथील नामांकित नाट्यसंस्था सहभागी होणार आहेत. मराठी नाटक, दीर्घांक, एकांकिका आणि एकल नाट्यप्रयोग अशा विविध कलाविष्कारांमुळे हा महोत्सव मराठी रंगभूमीचे वैविध्य अधोरेखित करणारा ठरणार आहे.नाट्यसंस्था, लेखक, दिग्दर्शक आणि कलाकार यांना एकत्र आणून परस्पर संवाद, अनुभवांची देवाणघेवाण आणि नवोदित कलाकारांना प्रेरणा देण्याचा उद्देश या महोत्सवामागे असल्याचे आयोजकांनी सांगितले.उद्घाटनाच्या दिवशी होणाऱ्या अलेक्झांडर व्हाया डायोजेनिस या नाटकासह पुढील तीनही दिवस होणाऱ्या दर्जेदार नाट्यप्रयोगांचा रसास्वाद घेण्यासाठी नांदेडकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन स्वनरंग सांस्कृतिक संस्थेचे अध्यक्ष दिनेश कवडे यांनी केले आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com मो.९४२२१७४७७४